मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्त:

म प्र

# हितगुज

अंक ५७ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● मार्च २००४

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## हसणं एक शोभादर्शक (कॅलिडोस्कोप)

*मराठे प्रतिष्ठानच्या पुणे अधिवेशनात वाचलेली कविता*

**- नितीन शंकर** (पृ.३९७), नाशिक

- आई दिसताच पाळण्यातील शिशूने हात पुढे करून केलेलं निर्व्याज हसू.

- आपल्या पाठीमागून मानेला मिठी मारत केलेलं बालकाचं निर्मळ हसू.

- खाऊ किंवा खेळणं मिळताच लहान मुलाचं खुदकन केलेलं हसू.

- शाळेत पहिला नंबर मिळवून घरी आलेल्या मुलाचं अभिमानी हसू.

- कॉलेजात गेल्यावर नवीन ओळख झालेल्या मित्राला/ मैत्रिणीला पाहिल्यावर केलेलं लाजरं हसू.

- वर्ग चालू असताना तीन-चार जणांच्या आडून मैत्रिणीला पहाताना नजरानजर होताच फेकलेलं दिलकश हसू.

- प्रियकराला वाट पहात ठेवून उशीरा आल्यावर राग काढण्यासाठी केलेलं लटकं हसू.

- साध्याशा विनोदावर दाद देणारं अल्लड तरुणीचं अवखळ हसू.

- फिरतीवरून आलेल्या पतीचं स्वागत करताना अभिसारिका बनून पत्नीनं केलेलं प्रेमभरं हसू.

- दाखवायला नेलेल्या उपवर तरुणीचं अंगठ्याने जमीन उकरत ओठाच्या कोपऱ्यातून केलेलं सीमित हसू.

- गर्दीचा फायदा घेऊन धक्का मारून वर तोंड केलेल्या मुर्दाडाचं लंपट हसू.

- साडीच्या दुकानातील विक्रेत्याचं बेगडी हसू.

- उच्चभ्रू प्रतिष्ठांचं पार्टीमधील दांभिक हसू.

- विनोदी नाटक-सिनेमा पहाताना धबधब्याप्रमाणे खळखळून वहाणारं हसू.

- वरिष्ठ समाचाराला आल्यावर पलंगावरून उठत आजाऱ्याने केलेलं निर्बळ हसू.

- मुलाने दैदिप्यमान यश मिळविल्यावर आईवडिलांचं कृतार्थ हसू.

- परिचिताला पाहून केलेलं औपचारिक हसू.

- लुच्च्या, लबाड राजकारण्यांचं लोभी हसू.

- रूपगर्वितेचं अहंकारी हसू.

- प्रतिष्ठितांना खेटे मारायला लावण्यात आनंद मानणाऱ्या, झारीतील शुक्राचार्यांचे वंशज असणाऱ्या सरकारी लोकांचं छद्मी हसू.

- वरिष्ठांची, नेत्यांची चमचेगिरी करून स्वत:च्या लायकीपेक्षा अधिक अधिकार गाजवून इतरांना त्रास देणाऱ्या चमच्यांचं लोचट हसू.

- दारिद्र्याची फाटकी गोधडी पिढ्यानपिढ्या घेऊन उच्चवर्णीयांची लाचारीने सेवा करीत असलेल्या दलितांचं कसनुसं हसू.

- जाहिरातीत काम करणाऱ्यांचं व्यावसायिक हसू.

- उचलेगिरी करतांना पकडले गेल्यावर चोराने केलेलं ओशाळं हसू.

- ध्यानस्थ योगीराजांचं ब्राह्मानंदात तल्लीन झाल्यावर आपोआप उमटणारं चिदाकार हसू.

- असं हे हसणं, हास्य, हसू, स्मित आणखी बरंच काही.

- दुसऱ्याच्या उत्कर्षाला दाद देताना द्वेष, असूया, मत्सराचा गंधसुद्धा नसावा.

- असं असावं हसणं. दिल्यानं वाढतं. न मागता मिळतं. असं हे हसणं.

आणि हे हसणं ईश्वराचं देणं आणि मानवाचं लेणं!

***

### सुट्टीचा सदुपयोग करण्याची संधी

उन्हाळ्याच्या सुटीमधे ट्रेकिंग, रॉक क्लायंबिंग व रॅप्लींग शिकण्याची इच्छा असलेल्या तरुण तरुणींनी **कर्नल** (नि.) **प्रमोदन मराठे** यांच्याशी संपर्क साधावा. फोन : ९८२२२९०८७६.

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ सभा**

दर महिन्याच्या **१ल्या** शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा घेतली जाते. सभेच्या दिवशी सायं. ५ वाजता कोणीहि कुलबांधव कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत जानेवारी १० व फेब्रुवारी १४ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. १०/१२ च्या सभेत पुण्यात पार पडलेल्या ७व्या अधिवेशनाबाबत सर्व सदस्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यवाहांनी पुणे शाखेला यासंबंधी अभिनंदनपत्र पाठवल्याचे सांगितले.

दि. १४.२.२००४ च्या सभेला पुण्यातून कर्नल (नि.) **प्रमोदन मराठे** मुद्दाम उपस्थित होते. उद्योग प्रेरणा उपक्रमाआंतर्गत पुणे अधिवेशनात झालेल्या चर्चेला १५ उद्योजक उपस्थित होते. याबाबतीत पुढे पाऊल टाकायचे तर काय करायला हवे याबाबत चर्चा झाली. **हेमंत महादेव** यांनी या उपक्रमाला फारसा प्रतिसाद नाही ही गोष्ट लक्षात घेऊन तरुणांना उत्साहित करण्याची योजना असायला हवी, त्यासाठी आपण लहान उद्योजकांना कोणती माहिती आवश्यक आहे त्याची व्यवस्था करूया, त्यासाठी एक परिपत्रक तयार करून इच्छुक तरुणांना पाठवूया असे सुचवले. प्रमोदन मराठ यांनी अशा तरुणांकडून माहिती मागविण्यासाठी एक नमुना फॉर्म तयार केलेला होता. त्याबाबतची चर्चा झाली. चर्चेअंती असा निर्णय घेण्यात आला की सर्वश्री हेमंत महादेव, विलेपार्ले, हेमंत अरुण, नालासोपारा, काशिनाथ (ऊर्फ प्रकाश) श्रीपाद, मुंबई, पुष्कराज वामन, जोगेश्वरी, मुंबई आणि कर्नल (नि.) प्रमोदन मराठे, पुणे या सदस्यांची **उद्योग प्रेरणा समिती नियुक्त करण्यात यावी** असे ठरविण्यात आले. ***

## *केवढे हे सौजन्य*

डिसेंबर २००३ चा अंक मिळाला पृ. क्र. ९ व ११ वर प्रतिष्ठान वृत्तमधे, गोमंतक मराठे परिवार संमेलन शीर्षकाखाली माझ्याबद्दल काढलेल्या उद्गाराबद्दल धन्यवाद. फक्त एक चूक दुरुस्त करावी. मी संचालक राज्य शिक्षण संस्था, गोवा शासन म्हणून निवृत्त झालो, शिक्षण संचालक म्हणून नव्हे. (ही जागा उपसंचालक शिक्षण खाते ह्या दर्जाची होती.)

- **कालिदास बाळकृष्ण** (पृ.५४१), फोंडा, गोवा

# करोडपती पासबुक

भौतिक संपदा सुरक्षित रहावी म्हणून प्रत्येक जण जागरूक असतो. शारीरिक संपदा याहूनहि जास्त मौलिक. मात्र शारीरिक संपदा टिकवण्यासाठी फारच थोडे लोक जागरूक असतात.

मी स्वत: अल्सरचे ऑपरेशन आणि नंतर अँजीयोप्लास्टी होईपर्यंत स्वत:च्या स्वास्थ्याबाबत बेफिकिर होतो. त्यानंतर डॉ. पटवर्धनांच्या सल्ल्याने हळूहळू व्यायाम वाढवून त्यांच्या ग्रुपबरोबर सायकलिंग, ट्रेकिंग करू लागलो, आणि या पुस्तकांत दिलेल्या चाचण्यात लखपतीच्या वर गुणांक गाठले. ३ मिनिटे जागेवर जॉगिंग, एक मिनिट श्वास रोखता येणे, ठराविक वेगाने पळता किंवा चालता येणे, हृदयाचे ठोके सकाळी उठल्याबरोबर बघणे वगैरे चाचण्या लाख मोलाच्या आहेत.

- **यशवंत लक्ष्मण** (पृ.१०१), पुणे
विंग कमांडर (निवृत्त), वय वर्षे (७१)

# आरोग्याची दारिद्र्यरेषा

| | | करोडपती | | लखपती | | मध्यम वर्गीय | | दरिद्री | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | श्वास रोखून धरणे (मिनिटे) | १.३० मि. किंवा जास्त | | ४६ सेकंद ते १.२९ मि. | | २०-४५ सेकंद | | २० सेकंद किंवा कमी | |
| २) | १ कि.मी. चालणे सपाटीवर, विनाअडथळा | ६.३० मिनिटे | | ६.३१ ते ८ मिनिटे | | ८-१२ मिनिटे | | १२ पेक्षा जास्त मिनिटे | |
| ३) | ३ कि.मी. पळणे (मिनिटे) | १२ किंवा कमी | | १२-१५ | | १६-२५ | | २५ पेक्षा जास्त | |
| ४) | सिट अपस् | ५० किंवा जास्त | | ४०-४९ | | ३०-४९ | | ३० पेक्षा कमी | |
| ५) | नाडीचा वेग (प्रति मि.) सकाळी झोपून उठल्यावर हालचाल करायच्या आधी | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला |
| | वय २०-२९ | ५५ | ५८ | ५८ | ६१ | ६१ | ६३ | ६५ | ६८ |
| | ३०-३९ | ५८ | ६१ | ६१ | ६४ | ६४ | ६७ | ७० | ७३ |
| | ४०-४९ | ६३ | ६६ | ६६ | ६९ | ६९ | ७२ | ७५ | ७७ |
| | ५० व पुढे | ६५ | ७० | ६८ | ७३ | ७१ | ७२ | ७८ | ८० |

'करोडपती पासबुक'मधून
लेखक डॉ. शिरीष पटवर्धन, पुणे (फोन : २५५३३६०८)

***पुण्यांतील वैद्यक व्यावसायिक डॉ. शिरीष पटवर्धन यांनी पैशाची (पासबुकाची) भाषा वापरून निरामय जीवनासाठी रोज आणि जन्मभर व्यायाम करण्याचा मंत्र करोडपती पासबुक या छोटेखानी पुस्तकांतून (४ १/४ इंच x ५ १/२ इंच ९६ पाने) दिला आहे. अतिशय साधा, सोपा, सटसटीत, कोणालाहि कोणत्याहि वयात केव्हाही व कोठेहि करता येईल असा व्यायाम सांगितला आहे. करोडपती, लखपती, मध्यमवर्गीय व दरिद्री असे विविध निकषानसार केलेले वर्गीकरणाहि विचार करायला लावणारे आहे. - संपादक, हितगुज***

***

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**मधुसूदन खांबेटे यांची**
**लघुउद्योजकांना उपयुक्त पुस्तके**

मुक्त अर्थव्यवस्था व जागतिकीकरण यांबाबत गेल्या १०-१२ वर्षात झालेल्या बदलांमुळे छोटे उद्योजक अडचणीत येत आहेत. त्यांच्या पुढे नवनवीन समस्या निर्माण होत आहेत. या संदर्भात ज्या ज्या विषयांचा साधक बाधक अभ्यास होणे गरजेचे वाटते त्या त्या विषयांवर छोट्याशा पुस्तिका प्रकाशित करण्याचे आपले कुलबांधव मधुसूदन रामकृष्ण खांबेटे (पृ.६९५) ठाणे लघुउद्योग संघटनेचे प्रवर्तक व संस्थापक, अध्यक्ष (फोन : २५८२०४२९, २५८२२४९३) यांनी ठरवले आहे. त्यानुसार पुढील पहिल्या ४ पुस्तिका प्रकाशित झाल्या आहेत. १) आर्थिक मंदी २) आमची चीनची भेट ३) औद्योगिक नगरी ४) इन्स्पेक्टर राज. लघुउद्योजकांसाठी लिहिलेल्या या पुस्तिकांबाबत श्री. खांबेटे यांचे कुलबांधवांतर्फे अभिनंदन.

**शैक्षणिक गुणवत्ता वाढीबाबत**
**कालिदास बाळकृष्ण यांचे मार्गदर्शन**

गोव्यातील आपले कार्यकर्ते कुलबांधव, गोव्यातील राज्य शिक्षण संस्थेचे माजी संचालक कालिदास बाळकृष्ण (पृ.५४१), फोंडा, गोवा, यांनी त्यांच्या ३५ वर्षांच्या शिक्षण खात्यांतील प्रदीर्घ सेवेत शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढवावी याच्या विविध पैलूंचे विवेचन करणारे अनेक लेख लिहिले. त्यातल्या ११ लेखांचे पुनर्लेखन करून ''अशी वाढवूया शैक्षणिक गुणवत्ता'' या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यांत आले आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक सर्वांनाच मार्गदर्शक विचारांचे पुस्तक उपलब्ध केल्याबद्दल 'का.बा.' यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

## नांदा सौख्य भरे

१) प्रतिष्ठानच्या पुणे शाखेचे आधारस्तंभ **वामन आत्माराम ऊर्फ आण्णा यांचा नातू आलोक रविंद्र** (पृ.३६६) याचा विवाह शिल्पा मारुतराव सावंत हिच्याशी १४.१२.२००३ रोजी पुण्यात करण्यात आला.

२) पुण्यातील प्रतिष्ठानचे सभासद **सुधाकर जगन्नाथ**, डॉ. ऑफ म्युझिक, **यांचा कनिष्ठ पुत्र धनंजय याचा विवाह** भावगंधा भास्कर देवधर हिच्याशी २२-२-२००४ रोजी पुण्यात सुवर्णस्मृती मंगल कार्यालय, डेक्कन जिमखाना येथे मोठ्या थाटात पार पडला.

**सर्व नवविवाहित वधुवरांना**
**मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.**

### *'जीवनधारा'ची ओळख*

**- सौ. विद्या वैशंपायन** (विठ्ठल महादेव, पृ.२३५, यांची मुलगी)

***विठ्ठल महादेव यांच्या 'जीवनधारा' या पहिल्यावहिल्या कथासंग्रहाच्या प्रकाशनाची बातमी मागील डिसेंबर अंकात वाचली असेलच. प्रकाशन १७.४.२००४ रोजी सांगलीतल्या खरे मंगल कार्यालयात प्रसिद्ध समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांच्या मुलीने पुस्तकाचा परिचय प्रत्येक कथेचे नांव आणि वैशिष्ट्य काव्यांत गुंफून करून दिला. ती ही कविता - संपादक.***

**'पेन्शनचा फोटो'** काढल्यावर कथासंग्रह छापण्याचे ठरविले।
उद् वेलीच्या सहकार्याने स्वप्न अनपेक्षित पूर्ण झाले।

अचानक स्वप्नपूर्तीने बसला **'धक्का'** सुखद आश्चर्याचा।
अर्पण करतो मातापित्यांना नजराणा १६ कथांचा।

मनाला लावते चटका **'साडेसाती'** अन **'चकवा'**।
जीवनातील आशेच्या **'मृगजळांचा'** भास फारच फसवा।

**'काळाय नमः'** म्हणत मात त्यावर केली।
अन थोडीशी खुसखुशीत **'गळती'** साकारली।

मोलकरणीच्या अनुपस्थितीत फजिती **'बदलाबाई'** करतात।
**'अवसान'** अन **'फोन आला फोन'** पोट धरून हसवतात।

शेजाऱ्यांच्या कटकटीतून सोडवतो **'तोडगा'**।
**'ॲफिडेविट'** दाखवते सरकारी कामाचा बडगा।

पंखात बळ आल्यावर मुले होतात कृतघ्न अन नादान।
या कटूसत्याचा करतात परिचन **'निदान'** आणि **'समाधान'**।

अनुभवाच्या विश्वातच झाला उगम **'जीवनधारे'**चा।
सहजगत्या झाला संगम, कल्पना आणि सत्याचा।

जीवनधारेतील प्रत्येक अनुभव असे तुमचा आमचा सगळ्यांचा।
निश्चितच होईल मोह अन घ्याल **'निर्णय'** सर्व कथा वाचण्याचा।

## सहवेदना

१. मुलुंड, मुंबई येथील सभासद, **भालचंद्र गंगाधर** (पृ.२७३) **यांची तृतीय कन्या हेमांगा** (माने) हिचे अमेरिकेत कॅलिफोर्निया येथे ५ जुलै २००३ रोजी अचानक आजाराने निधन झाले. ती पतीसह सुमारे ६ वर्षे तिकडे रहात होती.

२. पुण्यांतील तरुण कार्यकर्ते **उदय गणेश** (पृ.२७४) **यांची आई श्रीमती पद्मजा** यांचे नुकतेच निधन झाले. त्या ६८ वर्षांच्या होत्या. १९८२ साली पति निधनानंतर नर्सिजचा व्यवसाय करून मुलांना शिकवून स्वतःच्या पायावर उभे केले.

३. पुण्यातील **प्रतिष्ठानच्या धडाडीच्या कार्यकर्त्या सौ. मीना भालचंद्र** (पृ.४४०) यांचे अचानक दि. १३.२.२००४ रोजी हृदयविकाराने निधन झाले.

४. **भोपाळ येथील कुलबांधव लक्ष्मण गोपाळ** (पृ.९६) यांचे १९८८ साली निधन झाले. त्यांची पत्नी निवृत्त प्राचार्या, कन्या ज्युनियर कॉलेज भोपाळ ह्या पुण्यांतील संमेलनाला आवर्जून उपस्थित होत्या. (पहा हितगुज डिसेंबर ०३, पृ. ६ वरील चौकट)

५. मुलुंड, मुंबई येथील प्रतिष्ठानचे सदस्य दत्तात्रय विष्णु खांबेटे (पृ.७०४) यांचे डिसेंबर २००३ मधे अचानक निधन झाले. ते नुकतेच महाराष्ट्र स्टेट फायनान्स कॉर्पोरेशनमधून निवृत्त झाले होते.

६. मुंबईतील कुलबांधव **मधुकर श्रीराम** (पृ.४८) यांची धाकटी बहीण कु. कुंदा श्रीराम, वय ५३, यांचे २६ डिसेंबर २००३ रोजी निधन झाले.

७. **परळ, मुंबई येथील सदस्य विनायक महादेव** (पृ.२२९) **यांची आई लक्ष्मीबाई** यांचे मंगळवार दि. ६.१.२००४ रोजी दुःखद निधन झाले. त्या ८० वर्षांच्या होत्या.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मराठे परिवार सहभागी आहे.**

***

# मुंबई-पुण्याची मोट बांधणाऱ्या मीनाताई

**- सौ. नीलांबरी रमेश** (पृ.२८०), पुणे



मीनाताई खरंच तुम्ही गेलात?

मराठे प्रतिष्ठानचे काम करताना **सौ. मीना भालचंद्र** (पृ.४४०) यांच्याशी नव्याने ओळख झाली. कामानिमित्त सतत संबंध आल्यामुळे दिवसेंदिवस सहवास वाढत गेला आणि खरोखरच ओळखीचे रूपांतर मैत्रीत केव्हा आणि कसे झाले ते कळलेच नाही. पण दुर्दैवाने आमची ही मैत्री फार काळ टिकू शकली नाही कारण सौ. मीनाताईंचे अकस्मात झालेले निधन! वयाच्या अवघ्या ५६व्या वर्षी अल्पशा आजाराने त्यांचे १३.२.२००४ रोजी दु:खद निधन झाले. ही बातमी त्यांच्या सुनेने (सौ. मंजिरी अरुण) १५.२.२००४ रोजी संध्याकाळी मला फोनवर सांगितली तेव्हा माझा तिच्या शब्दांवर आणि माझ्या कानांवर विश्वासच बसत नव्हता.

सौ. मीनाताई पूर्वी मुंबईत रहात होत्या आणि सध्या पुण्यात स्थायिक झाल्या होत्या त्यामुळे त्यांना मुंबई व पुणे दोन्हीची माहिती होती. मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून त्या सदस्य होत्या. त्यामुळे काही मिटींगला माझ्याबरोबर मुंबईला आल्या होत्या तर मराठे प्रतिष्ठानच्या अनेक मिटींगला त्या पुणे शाखेतर्फे हजर राहून पुण्याचे नेतृत्व करत होत्या.

अशा या मुंबई आणि पुण्याची मोट बांधणाऱ्या पुण्यातील कृतीशील, क्रियाशील आणि उत्साही कार्यकर्त्या सौ. मीनाताई यांना पुणे शाखेतर्फे विनम्र अभिवादन! भावपूर्ण श्रद्धांजली!

२२ ते २४ डिसेंबर २००३ रोजी पुण्यामधे जो ७वा अखिल भारतीय मेळावा झाला होता त्यात सर्वांचे व विशेषत: मराठ्यांच्या माहेरवाशिणींचे हसतमुखाने स्वागत करुन त्यांची ओटी भरुन आईच्या मायेने त्यांची पाठवणी करणाऱ्या मीनाताई सर्वांनाच परिचित झाल्या होत्या.

सौ. मीनाताई या नुसत्या आदर्श कार्यकर्त्याच नव्हत्या तर माझ्या निरीक्षणातून त्या एक आदर्श पत्नी, आदर्श माता, आदर्श सासू आणि आदर्श आजी अशा कितीतरी आदर्श नात्यांनी भारलेल्या होत्या.

अशा या सर्वगुणसंपन्न सौ. मीनाताईंच्या आत्म्यास शांती व सद्गती मिळो एवढीच परमेश्वर चरणी प्रार्थना!

***

# पुणे संमेलनाबाबत कुलबांधवांच्या प्रतिक्रिया

## क्रांतिकारक संमेलन

या संमेलनाचे वैशिष्ट्य किंवा एक प्रकारची क्रांतीच म्हणणे वावगे ठरू नये अशी गोष्ट म्हणजे ईशस्तवनातील वेदोक्त मंत्रापासून ते आशीर्वचनाचे मंत्रघोषापर्यंतचे सर्व गायन सौ. मंगला मराठे व सौ. सुनिता मराठे यांनी केले. पूर्ण सत्रांचे सूत्रसंचालन सौ. नीलिमा पटवर्धन, सौ. निर्मला मराठे, सौ. जयश्री मराठे, सौ. शुभदा मराठे यांनी बुद्धीचातुर्य, विनोदी भाषा शैलीत काळावेळाचे व पुढील कार्यक्रमांचे भान ठेवून अतिशय नेटकेपणाने, समयसूचकतेने केले.

संयोजिका सौ. नीलांबरीबद्दल काय लिहावे? त्यांनी एकूण अधिवेशनाचे नियोजन कल्पनाचातुर्याने व सर्वांमध्येच सहभाग असूनही, स्टेजवर खूर्ची न अडविता अलिप्तपणाचे भावनेने केले होते.

"Formula for Success" तरुणांसाठी विकास मार्गदर्शन. हा कर्नल प्रमोदन मराठे यांचा कार्यक्रम औचित्यपूर्ण व आजची गरज काही अंशाने का होईना दिग्दर्शित करणारा होता. तरुणांसाठी तो दीपस्तंभ ठरेल. ''कुटुंबसल्ला केंद्राची'' गरजही वादातीत आहे.

मराठे परिवाराचे नातेवाईक (अच्युत महादेव चक्रदेव, पृ.७३२, यांचे जावई) श्री.

*(पुढील पानावर....)*

## *बोट कापलं तरी आपलंच असतं, तोडता येत नाही*

परस्पर परिचयासाठी 'ओळख परेड' या खेळाचे सूत्रधार होते गोव्याचे उत्साही कार्यकर्ते श्री. कालिदास मराठे. प्रत्येकाला एक नंबर देऊन जोड्या जमविण्यात आल्या. परस्परांनी एकमेकांना आपली माहिती द्यायची होती आणि मग रंगमंचावर स्वत:ची ओळख नव्या परिचिताकडून ऐकायची होती. ओळख करून देणारा नवीन ओळखीचा असल्याने एक अनोखी रंगत या कार्यक्रमाला आली.

माझी सवंगडी होती सौ. मालिनी जयंत गोखले. मराठ्यांची माहेरवाशीण! आणि मी मराठ्यांची सासुरवाशीण! मी जर मराठे बांधवांचे दोष दाखवले तर माहेरवाशिणीला राग यायला पाहिजे - निसर्गनियमानुसार! पण माझ्या मताशी त्या वन्सं सहमत झाल्या. ते मत म्हणजे - मराठे पुरुषवर्ग तापट आहे, करारी व हेकट आहे. सहसा नणंदा भावजयामध्ये न होणारे मतैक्य इतके बेमालून जमले. आमच्या बांधवांनीहि ते मनमोकळेपणाने मान्य केले. त्यांना आपल्या तापट आणि करारी स्वभावाचा जाज्वल्य अभिमान आहे असे दिसून आले. मला मिळालेला हा एक चांगला अनुभव.

तर असो! बोटाला रक्ताची धार लागली तर आपण ते तोडून बाजूला ठेवत नाही कधी. कारण कापलं तरी आपलच असतं.

**- सौ. माधवी श्रीकृष्ण** (पृ.२८८),
गोरेगांव, मुंबई.

# श्रीव्याडेश्वर

***महाराष्ट्र चित्पावन पत्रिकेचे कार्यकारी संपादक माधव मराठे यांनी लिहिलेली आपल्या अनेक कुलबांधवांचे कुलदैवत श्री व्याडेश्वर यांच्या उत्पत्तीची ही माहिती. महाराष्ट्र चित्पावन पत्रिकेच्या देवदिवाळी विशेषांक शके १९२४ मधून पुनर्मुद्रित केली आहे. - संपादक***

मंगल कार्याचे प्रसंगी व वार्षिक नैवेद्याच्या वेळी कुलदेवतांचे स्मरण करावे लागते. ज्या देवतेच्या कृपाप्रसादामुळे आपल्या पूर्वजांचा अभ्युदय झाला अशी भावना असते. ती देवता त्या त्या घराण्यात परंपरेने कुलदेवता मानली जाते. आपल्या पूर्वजांनी ज्या देवतेची उपासना केली ती देवता त्या घराण्यात कुलदेवता म्हणून पूजिली जाऊ लागली.

चित्तपावन अनेक पूर्वज हे शिवउपासक असल्यामुळे त्यांनी आपल्या गावातील किंवा परिसरातील शिवमंदिरात जाऊन उपासना केली व ते शिवमंदिर घराण्याचे कुलदैवत झाले. अनेक चित्तपावन गुहागर परिसरातील असल्यामुळे तेथील श्री व्याडेश्वर ही त्यांची कुलदेवता झाली. सुमारे साठ आडनावाच्या २०० घराण्यांचा व्याडेश्वर हा कुलस्वामी आहे. **व्याडेश्वराचे वर्णन श्री व्याडेश्वर या संस्कृत महाकाव्यात आहे.**

चिपळूणपासून २८ किलोमीटर अंतरावर कोकणांतील गुहागर या गांवी व्याडेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर ११०० वर्षांपूर्वीचे आहे. मंदिराच्या संकुलांत गणपती, सूर्य व लक्ष्मी यांची लहान मंदिरे आहेत.

व्याडेश्वर आणि वाडेश्वर हे एकच आहेत. याबद्दल एक लोककथा अशी सांगतात की, परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय केल्यावर सर्व जमीन दान केली. त्यानंतर स्वत:ला राहाण्यासाठी कोकण-भूमीत समुद्र मागे हटवून अपारान्त-भूमी

---

*(.......प्रतिक्रिया, मागील पानावरून)*

सुहास दीक्षित यांनी रेल्वेचे working कसे चालते हे विशद करणारे Model अधिवेशनात ठेवले होते. रेल्वेचे रुळ, सिग्नलस चालू-थांबणे या क्रिया, TC व हमालाची कामगिरी, झेंडा दाखविणे वगैरेची माहिती प्रात्याक्षिकाद्वारे दिली. हे Model हे उपस्थितांचे मोठे आकर्षण ठरले. श्री. दीक्षितांच्या पत्नीने एक गीत सादर केले. चिमुरड्या मुलाने सभाधीटपणे तबला वादन केले व त्याचे मातुश्रीने गाण्याला तबला साथ केली. कदाचित हे कमी पडले म्हणून त्यांचेकडे कामास असलेली कु. मंजू चिकणे हिने रेल्वे Model प्रात्यक्षिकांत निवेदकाची भूमिका बजावली. अशा तऱ्हेने अवघे कुटुंब अधिवेशनमय झाले होते.

- **भास्कर नरहरी** (पृ.४६), रत्नागिरी.

## अप्रतिम कार्यक्रम चुकल्याची खंत

हे पत्र लिहिण्याचे कारण की हितगुज डिसेंबरचा अखिल भारतीय अधिवेशन पुणे अंक मिळाला. ह्या अंकात चित्ररूपी संपूर्ण अधिवेशनाची माहिती वाचून पाहून आमच्यासारखे काही कारणांनी अधिवेशनाला न येऊ शकणाऱ्यांना प्रत्यक्ष अधिवेशनांतच भाग घेतल्याचे समाधान मिळाले.

सर्व वृत्तांत वाचल्यावर ह्या अप्रतिम कार्यक्रमाला उपस्थित राहू शकलो नाही ह्याची खंत मनाला खूपच जाणवली. ह्या प्रकारचे सोहळे **मे, जून च्या सुट्टीत घेतले तर** शाळेत जाणाऱ्या मुलांच्या पालकांना **आपल्या मुलांसह उपस्थित राहता येईल** व आपल्या कुळातील उच्चस्तरीय मंडळींना भेटता येईल. त्यांच्या अनुभवांच्या गोष्टीचे मार्गदर्शन मिळेल व मुलांच्या कलागुणांची ओळख होईल.

- **अनिलकुमार दत्तात्रेय जाईल** (पृ.७५४) घाटकोपर, मुंबई.

## संमेलनात सर्व भावपूर्ण होते, कृत्रिमता कुठेच नव्हती

संमेलनाचे सविस्तर वर्णन व अनेक छायाचित्रांमुळे हितगुज डिसेंबर अंक संग्रहणीय झाला आहे. अंक वाचल्यानंतर संमेलनाला अनुपस्थित राहिलेल्या सभासदांना ''अरे चुकलच, संमेलनाला जायला पाहिजे होते असे वाटेल.'' पुणेकर मंडळीनी संमेलन यशस्वी करण्यास फारच मेहनत घेतली होती. आपल्या घरच्या एखाद्या कार्याला जाऊन आलो अशी सर्वांची भावना झाल्यास नवल नाही. सुरवातीला सुहास्य वदनाने स्वागत व शेवटी निरोप हे सर्व भावपूर्ण होते. त्यात कृत्रिमपणा कोठेच नव्हता.

- **विठ्ठल महादेव** (पृ.२३५), सांगली.

## आनंदतरंग उठवणारी माणसे

मी आयुष्यात पहिल्यांदाच माझ्या सासरच्या संमेलनाला आले आणि मग मला समजले की कितीही वय झाले तरी आनंदतरंग उठवणारी माणसे आपल्या कुलबांधवामध्ये आहेत.

सासरचे अधिवेशन असून जणु आपण माहेरीच आलो आहोत असे मनोमन जाणवत होते. हे ३ दिवस खूप आनंदात गेले. अनेकांशी नव्याने ओळखी झाल्या.

या सुखद आठवणीची स्मृती कायम स्वरूपी आपल्याजवळ रहावी म्हणून मी मुद्दाम सर्व फोटो व कार्यक्रमाची CD विकत घेतली आहे. ते पुन्हा पुन्हा पाहून आठवणींना उजाळा देत आहे.

- **माधुरी मधुसूदन खांबेटे**, पुणे

## उत्साहाने मंदिर भरले

***पुणे संमेलनात सत्कार प्रसंगी म्हटलेली कविता***

- **श्रीमती सुशीला दत्तात्रय** (पृ.१०८), पुणे

उत्साहाने मंदिर भरले। गोत्रज सारे येथे जमले।
सान थोर श्रीमंत गरीबहि। विद्याभूषित अल्पशिक्षितहि।
भेदभाव मुळि येथे नाही। एकच आहे कुटुंब आपुले।
उत्साहाने मंदिर भरले।।१।।

परस्परांची ओळख व्हावी। स्नेह बंधने दृढ बांधावी।
सदई जपुनी ती ठेवांवी। इच्छितात हे मनात सगळे।
उत्साहाने मंदिर भरले।।२।।

प्रतिवर्षी व्हावे संमेलन। पुन: पुन्हा भेटूया आपण।
अमूर्त प्रभुला करुनि वंदने। आनंदाचे फुलव मळे।
उत्साहाने मंदिर भरले।।३।।

***

निर्माण केली.

येथील पवित्र भूमीवर राहाण्यासाठी अनेक ऋषिमुनी आले. आपआपल्या आवडीनुसार या पवित्र कोकणभूमीत त्यांनी आपले आश्रम स्थापन केले. **व्याड नावाच्या एका तेजस्वी ऋषीनी भगवान् परशुरामाच्या संमतीने एका गुहेत वास्तव्य केले**. व्याड ऋषी अत्यंत विद्वान होते. भगवान शंकरावर त्यांची नितांत श्रद्धा होती. त्यांनी एका शिवलिंगाची स्थापना केली व आपल्या आश्रमांतून अनेक विद्यार्थ्यांना वेद-विद्या शिकविण्यास प्रारंभ केला. तसेच महादेवाच्या शक्तीचे व भक्तीचे धडे दिले. **येथील शिवलिंगालाच व्याड ऋषींचे नावावरून त्यांचे शिष्य श्री व्याडेश्वर या नावाने ओळखू लागले.**

व्याड ऋषींनंतर काही वर्षांनी या आश्रमाकडे व शिवलिंगाकडे लोकांचे दुर्लक्ष झाले. अनेक वर्षानंतर या प्रदेशांत कायुराणा नावाच्या राजाचे राज्य होते. त्या राजाच्या चांभकुराणा नावाच्या राजपुत्राने या भागांत शिवलिंगाच्या जवळ वाडा बांधला व त्याचा उपयोग तो राजपुत्र आपले घोडे ठेवण्यासाठी तबेला म्हणून करू लागला. घोड्याच्या शिंगरांना दूध पाजण्यासाठी तेथे काही गायी ठेवल्या होत्या. या गायी आपल्या दुधाचा अभिषेक या शिवलिंगावर करीत असत. घोड्याचा व शिंगरांचा सांभाळ करणारे अश्वपाल यांच्या लक्षात ही गोष्ट आली. त्यांच्यातील एका अश्वपालाने रागावून त्या शिवलिंगावर जोरात काठीने प्रहार केला. तेव्हा त्या शिवलिंगातून रक्त वाहू लागले. हे पाहताच ते अश्वपाल घाबरले व त्यांनी हा प्रकार राजपुत्राला जाऊन सांगितला. राजा आपल्या राजपुत्रासह लगेच या वाड्याकडे आला व त्याने शिवलिंगातून वाहात असलेले दूध पाहिले. राजाने शिवलिंगाला वंदन करून दुधाचा अभिषेक करण्याची आज्ञा केली व आपल्या सेवकांमार्फत या शिवलिंगाविषयी माहिती गोळा केली.

हे प्राचीन व्याडेश्वराचे शिवलिंग असल्याचे समजताच कायुराणा राजाने या ठिकाणी मंदिर बांधले या मंदिराला काही लोक वाड्याजवळील मंदिर व्याडेश्वर म्हणून ओळखू लागले. तेच हे श्रीक्षेत्र व्याडेश्वर. ***

# एक समाजोपयोगी संस्था - श्रीमानव सेवा संघ, मुंबई

**- अनंत धोंडो खांबेटे** (पृ.६९८), शीव, मुंबई

ह्या उभ्या महाराष्ट्रांत, विशेषत: मुंबई-पुण्यांत असंख्य समाजोपयोगी संस्था कार्यरत आहेत. परंतु लग्नादी शुभकार्याला आपल्या संस्थेचे सभागृह भाड्याने देण्यापलीकडे विशेष उल्लेखनीय असे काहीच घडत नाही ही शोचनीय वस्तुस्थिती आहे.

''मानव सेवा संघ'' ही एक अद्वितीय सामाजिक संस्था ही उपरोक्त वस्तुस्थितीला अपवादात्मकच आहे. या संस्थेचे देखील लग्नादी कार्यासाठी सभागृह आहे. पण त्याखेरीज नानाविध उपक्रम ह्या ''मानव सेवा संघात'' राबविले जातात. अशा ''चाकोरी बाहेरच्या'' संस्थेचा आपणांस परिचय करून देण्याचा मानस आहे.

ह्या संस्थेचे पहिले नांव, ''हिंदू दीन दया संघ'' असे होते. पण महात्मा गांधी वधानंतर ''हिंदू'' हा शब्द जणू विटाळला. संस्थेच्या संचालकांनी, काळाची पावले ओळखून ''हिंदू दीन दया संघ'' चे ''मानव सेवा संघ'' असे नवे नामाभिधान केले.

''मानव सेवा संघ'' संस्थेच्या दोन विस्तीर्ण भूखंडावर स्थापिला आहे. टिळक रुग्णालय व किंग्ज सर्कल रेल्वे स्थानक यामध्ये ही संस्था आहे. संस्थेच्या दोन टोलेजंग ४-५ मजली इमारती आहेत. ह्या इमारतींमध्ये सर्व तऱ्हेचे उपक्रम राबविले जातात.

तळमजल्यावर सर्व तऱ्हेच्या औषधोपचारांची आरोग्य केंद्रे आहेत. दंतवैद्य, क्ष किरण विभाग, होमिओपॅथी, नॅचरोपॅथी, आयुर्वेद इ. इ. हा विभाग नेहमी गजबजलेला असतो. सेवेचा नाममात्र मोबदला!

परिचारिकेचा अभ्यासक्रम (नर्सिंग कोर्स) ह्याचे शिक्षण दिले जाते. पुष्कळ स्त्रिया ह्याचा फायदा घेतात.

''मानव सेवा संघाचे'' बोध चिन्ह म्हणजे, ''स्त्रीच्या दोन्ही हाती बालक'' असे आहे. मानव सेवा संघात अनाथ बालकांचा सांभाळ होते. पाळणाघर स्वतंत्र आहेच. नोकरी करणाऱ्या स्त्रिया याचा फायदा घेतातच. थोडीशी मोठी झालेली अनाथ बालके, आठ-दहा वर्षांची, दत्तक दिली जातात.

अलीकडे, घरोघरी स्वयंपाक घरातून विजेवर चालणारी उपकरणे, दाण्यांचे कूट, भाजी चिरणे, ताक करणे इ. इ. साठी विजेचा सर्रास वापर स्त्रिया करतात. ही विद्युत उपकरणे (किचन इलेक्ट्रिकल गॅजेट्स्) पुष्कळदा बिघडतात. त्यांची दुरुस्ती देखील येथे शिकवली जाते अत्यल्प शुल्कांत.

बालवाडी शिक्षिकेचा (माँटेसरी) अभ्यासक्रमाचे वर्ग येथे घेतले जातात. पुष्कळ मुली त्याचा फायदाही घेतात.

बेकरी प्रॉडक्टस् बनविण्याचे (केक्स्, बिस्कीट इ.) शिक्षण दिले जाते.


**ती. मातोश्री**
**मंदाकिनी दामोदर**
**यांच्या स्मरणार्थ**



**- श्री. प्रभाकर दामोदर मराठे,** वडाळा, मुंबई.

वैज्ञानिक युगात वावरण्याचे भान मानव सेवा संघाला आहे. त्यानुसार येथे अत्यल्प फी घेऊन कॉम्प्युटरचे वर्गही घेतले जातात. त्या वर्गाला प्रतिसाद देखील चांगला लाभला आहे.

**दोन वर्षापूर्वीच ५व्या मजल्यावर वृद्धाश्रम सुरू झाला आहे.** प्रतिसादही बरा आहे. माणशी दरमहा रु. ३।। हजार व रु. २०००० डिपॉझिट. नाश्ता, २ वेळा शाकाहारी जेवण व चहा वैद्यकीय मदत इ. सुमारे २० वृद्धांची सोय आहे.

एक व शेवटचा विशेष उल्लेखनीय उपक्रम १९९० नंतर सुरू झाला. त्याचे नांव, ''डे केअर सेंटर फॉर द एजेड''. ह्या केंद्रात, वृद्धांचे मनोरंजनासाठी कॅरम बोर्डस्, बुद्धीबळे, पत्ते, मासिके, वृत्तपत्रे, दूरदर्शन संच, रेडिओ, कॅसेटस्, रेकॉर्ड प्लेअर इ. सर्व आहे. योगासने, बाजापेटी शिकण्यासाठीही सोय आहे. ह्या केंद्रात हरेक महिन्याच्या शेवटी वृद्धांचे वाढदिवस साजरे होतात.

ह्या केंद्राची वार्षिक वर्गणी सुरवातीस म्हणजे १९९० साली फक्त १० रु. होती. नंतर ही वर्गणी रु. २०, रु. १००, रु. २०० व आज रु. ५०० झाली आहे. पटावर सुमारे ८० सदस्य आहेत.

वर्षातून एकदा १ दिवसाची सहलही काढतात. मी स्वत: या केंद्राचा सदस्य १० वर्षे होतो. एक संस्मरणीय सहल म्हणजे मुंबईतील सर्व नवी जुनी देऊळे-राऊळे स्पेशल बस करून दाखविली. वाळकेश्वर बाणगंगेपासून, हाजीअली, महालक्ष्मी, मतमाऊली, हरे राम हरे कृष्ण इ. इ. सर्व सकाळी ८ पासून रात्री ८ पर्यंत दाखविले. ह्या संस्थेजवळ भरपूर पैसा आहे. तसेच पैशाचा सदुपयोग करण्याची उमेद व सदिच्छाही! ***

# ज्येष्ठ नागरिक निवास - आजची गरज?

**- मीननाथ लक्ष्मण** (पृ.२८०), पुणे.

सध्याच्या व्यापारीक जगात अशा अनेकानेक माणसांची अत्यंत आवश्यकता भासत आहे. अगदी व्यक्तिसापेक्ष सांगायचे तर असा एक फक्त आपल्या मातापित्यांची सेवा अथवा पत्नी, मुलांचे भरण पोषणाऐवजी किमान १०/२० वृद्धांची सेवा व इतर निराधारांना, गरजूंना आधार, मार्गदर्शन करू शकेल.

व्यक्तिगतरीत्या जनसेवा करायची तर त्यासाठी छोट्या प्रमाणात तरी आश्रमासारखे निरामय दिनचर्या प्रदान करणारे स्थान असणे अत्यावश्यक ठरते. जिथे प्रत्येक दिवस प्रसन्नतेने, उत्साहाने जगणे शक्य होईल. जिथे कदाचित लहान-मोठी शारीरिक दु:खे, व्याधी असतील जी अटळ आहेत.

मात्र अत्यंत अनावश्यक, त्रासदायक शहरी जीवनातील अनेक प्रकारचे त्रास, ताप नसतील, ज्यात प्रामुख्याने एकटेपणा आणि रिकामपणासह असुरक्षितता इ. अंतर्भाव होतो. तसेच ज्यांना शक्य आहे त्यांनासुद्धा सहजपणे रहदारीमुळे कुठे जाता सुद्धा येत नाही अथवा कोणीतरी वेळ काढून नेणे, आणण्याचे परावलंबित्व स्वीकारावे लागते. तसेच काही घरांमध्येसुद्धा 'जनरेशन गॅप' मुळे वैचारिक मतभेद तर होतातच पण क्वचित आर्थिक कारणावरुनही वादविवाद घडतात. सध्याच्या 'फास्ट फूड' च्या काळात ज्या वयस्कांना आवड नसून चालवून घ्यावे लागते ते वेगळेच, कधी लहान जागा हे 'गैरसोयीचे' कारण ठरू शकते. अर्थात निश्चितपणे या सगळ्यातून मार्ग काढून रहाणारे काही 'भाग्यवान' आहेतच आहेत. पण बहुसंख्य व्यक्ती अशा त्रासामध्ये दिवस कंठत असतात.

एक विरोधाभास असा की ज्यांना सहज शक्य आहे वा थोड्या प्रयत्नाने जमेल असे लोकही मुख्यत: सामाजिक लौकिक भयास्तव पर्यायी विचार करत नाहीत. तेवढे धाडस दाखवत नाहीत, आता याचे कारण काय असावे? आश्रमातील निवास इतका वाईट आहे की तिथे राहिल्यास समाज, नातेवाईक काय म्हणतील? अथवा अशा रहाण्याने मुलांवरची माया कमी होणार वा मुलाबाळांचे त्यांच्यावरचे प्रेम संपले इ. काही घडणार? एवढ्या २०/३० वर्षांचे घट्ट नातेसंबंध एवढ्याशा दुराव्याने संपुष्टात येऊ शकतील काय? आपण इतर अनेक बाबतीत बदल, सुधारणा करतो तर आजच्या वेगवान बदलाच्या काळात शब्दश: 'स्वान्तसुखाय' हा बदल सुद्धा स्वीकारायला दोन्ही पिढ्यांनी एकमेकांशी संवाद साधून निर्णय घ्यायला काय हरकत आहे? याबाबत चर्चा करून परस्पर विचाराने योग्य निर्णय घेण्यास बिचकू नये.

याबाबत प्रत्यक्ष सहाय्य करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी पत्राद्वारे शक्य असलेल्या सहाय्याची माहिती कळवावी. अशा उपक्रमात केवळ आर्थिक नव्हे तर ज्यांच्याकडे अतिरिक्त व विनावापर, विनाउपयोगी भूखंड अथवा घर इ. पुण्यापासून ४०/५० कि.मी. कक्षेत असलेल्यांनी पूर्णत: स्वेच्छेने व नाममात्र लॉंगलिज वर देण्याची तयारी दाखवल्यास त्याचे स्वागत केले जाईल. पत्ता : एम. एल. मराठे, ४९/७५८ लोकमान्य नगर, पुणे ४११०३०. अशा सहाय्याने उपक्रम कमी कालावधीत कार्यरत होऊ शकेल. धन्यवाद! ***

## *पुणे संमेलन : एक चिंतन*

संमेलनाच्या कार्यक्रमाची आखणी सूत्रबद्ध, तसेच राहण्याची व भोजनाची व्यवस्था उत्तम होती त्याबद्दल धन्यवाद. काही सूचना :

१) उपस्थित प्रत्येक सदस्याने आपल्या छातीवर एक टॅली लावावी तीवर पुढील नोंद असावी. अ) नांव ब) घराणे क) गावाचे नांव

२) संमेलनातील एका दिवशी स्थानिक प्रेक्षणीय स्थळे (अधिक पैसे घेऊन) पहाण्याची व्यवस्था असावी.

३) काही मराठे घराण्यांचे व्याघ्रेश्वर (आसूद) कुलदैवत असले तरी त्या देवस्थानामध्ये ही नोंद नाही तरी 'मराठे' या नांवाची तेथे नोंद करण्यासाठी कृपया पत्रव्यवहार करावा.

**- चिंतामण त्र्यंबक** (पृ.२४८), कळवा, जि. ठाणे.
**- प्रभाकर जगन्नाथ विद्वांस**, माटुंगा, मुंबई.

# महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व

- **सौ. सरोजिनी अनुरूप** (पृ.५१२), पुणे

नुकतीच महाशिवरात्र झाली. महाशिवरात्रीच्या आध्यात्मिक महत्त्वाविषयी हे प्रकट चिंतन. सर्वांच्या मनाला, बुद्धीला चालना देईल, प्रेरणा देईल असा हा नम्र प्रयत्न. महाराष्ट्रातील विशेषत: मराठे कुलबांधवांना, महान राष्ट्रातील महान मनुष्यांची अस्मिता जागृत करण्यासाठी हा शुभसंदेश आहे. 'मराठे' या शब्दाची व्युत्पत्ति मर + हट्ट अशीही सांगितली जाते. जो पुरुषार्थात मागे हटत नाही, केवळ मेल्यावरच थांबतो असा उद्यमशील पुरुषसिंह म्हणजेच मराठे - कुलबांधव.

अस्मिता जागृत करणे हे या व्रतामधील 'जागरण' होय. 'अस्मि' म्हणजे मी एक पवित्र, शांत, आनंदस्वरुप, ज्ञानस्वरुप, प्रेमस्वरुप अशी अविनाशी चैतन्य शक्ति, प्रकाशबिंदु आत्मा आहे. देह अभिमानात न येता आत्म्याच्या स्थितीमध्ये राहून शरीराद्वारे श्रेष्ठ कर्म करणे म्हणजे अस्मिता टिकवणे. स्वाभिमान अर्थात् शुद्ध अभिमानाला अनुसरूनच वृत्ति, दृष्टि, स्थिति, मति व कृति असणे. मी आत्मा परमपिता शिव परमात्म्याचा श्रेष्ठ, कल्याणकारी बालक आहे या जाणीवेत राहून, त्या परमपित्याच्या पावन, मधुर स्मृतीत राहून जीवनाची यात्रा आनंदात, उत्साहात सर्वांना बरोबर घेऊन पार पाडणं ही केवढी भाग्याची गोष्ट आहे!

**शिवरात्र** म्हणजे अज्ञानाच्या रात्री, 'आत्मा' रूपी लेकरांना तो 'सत्यं शिवं सुंदरम' शिवपिता ज्याला आपण सदाशिव, भोलानाथ, पापकटेश्वर, मुक्तेश्वर, सोमनाथ, रामेश्वर, विश्वेश्वर आदि अर्थपूर्ण नावांनी आवाहन करतो, तो आपल्याला पापकर्मातून, दु:खातून बाहेर येण्यासाठी एकच मंत्र देतो - 'मन्मना भव'. 'देह आणि देहाचे संबंध, वस्तु, वैभव आदि मीपणा ची आहुती द्या आणि माझ्यामध्ये मन लावा. माझ्या स्मृतीत मग्न व्हा' शिवपिता हाच आपली सद्गति करणारा सद्गुरु आहे त्याच्या या मंत्राप्रमाणे स्वत: आचरण करणे व इतरांनाही हा मंत्र सांगणं म्हणजे **उपवास** - परमात्म्याजवळ मनाने रहाणं होय.बुद्धियोग सतत त्याच्याशी जोडल्याने, माता, पिता, बंधु, सखा आदि नात्यांचे प्रेम त्याच्याकडूनच प्राप्त होते. गृहस्थजीवनात राहून कर्मयोगी राहूनही, मनबुद्धिरूपी नेत्रांनी. त्या ज्ञानसूर्याचे सुंदर रूप व त्याच्या असीम गुणांचा, शक्तींचा अनुभव करणं त्याच्या प्रेमसुधा रसपानात आनंदविभोर होणं यामुळे जीवन धन्य धन्य होते, होय ना?

अशा सुंदर क्षणांचा अनुभव घेताना आपण **बेलपत्र अर्पण करतो** अर्थात् मनसा, वाचा, कर्मणा सर्वांना सुख देतो. पाच विकार कामक्रोध लोभ अहंकाररूपी धोतऱ्याची फुलं ही वाहता म्हणजेच हे विकार केव्हा गळून पडतात हे आपल्याला कळतही नाही. 'देवा, विषयसागरातून मला बाहेर काढ' अशी आपणच आळवणी आतापर्यंत केली, पण नळावर बसून स्वत:लाच, 'गंगाराम पोपटा, नळावर बसू नको', असं समजावणाऱ्या, निरर्थक बडबडणाऱ्या पोपटाप्रमाणे आपली अवस्था होती. पण आता?

आता आपल्या प्रत्येक विचाराला आपण सुंदर दिशा दिल्यावर, सकारात्मक शुभचिंतनामुळे आपली शक्ति वाढली व कामविकाराचे रूपांतर पवित्र प्रेमात, क्रोधाचे रूपांतर अवगुणांवर क्रोध करण्यात, लोभाचे रूपांतर सत्संगात, मोहाचे रूपांतर प्रभुप्रेमात व अहंकाराचे रूपांतर आत्म्याच्या सुंदर स्थितीत रहाण्यात आपोआपच झाले. सहजप्रवृत्ति (Instincts) यांना दाबण्याची आवश्यकताच नाही तर विचारांचे उन्नयन Sublimation झाले. ही या व्रताची सांगता. स्वत:निमित्त बनून ईश्वरार्पित श्रेष्ठ कर्म करीत राहणं याने आपोआपच निरहंकारिता प्राप्त होते.

तेव्हा महाशिवरात्रीला प्रत्येकाने जर ही प्रतिज्ञा केली व रोज रात्री आत्मपरीक्षण केले तर तो दयाघन शिवपिता आपल्यावर प्रेमाची, शक्तीची वृष्टि करतो! प्रतिज्ञा सोपी आहे की - ''हे शिवपिता, आजपासून मी प्रत्येक विचार बोल व कर्म तुम्हाला आवडेल असेच करीन व तुमचा सुपुत्र बनून कुलदीपक होईन.''

***

## *वृद्धांसाठी डे केअर सेंटर्स*

- **सौ. मंगला प्रवीण** (पृ.३६१), गोरेगांव, मुंबई

**सुधारित वृद्धाश्रम ही एक समाजाला आवश्यक आणि उपयोगी अशी संस्था असेल पण तरीही तो शेवटचाच पर्याय रहाणार. सध्याच्या शहरी कुटुंबांच्या व्यावहारिक अडचणींचा विचार केला तर वृद्धांसाठी डे केअर सेंटर्स हा एक उपाय होऊ शकतो.** वृद्धांना दिवसभर एकटे रहाणे धोक्याचे वाटते. काहीजण पूर्ण स्वावलंबीपणे राहू शकत नाहीत. त्यांना सोबत कुणीतरी असण्याची गरज वाटते. घरातल्या तरूण मंडळींना सतत घरात रहाणे शक्य नसते. अशावेळी ही डे केअर सेंटर्स उपयुक्त ठरतील.

मात्र **ही सेंटर्स म्हणजे नुसती खाटांची रांग टाकलेली कोंडवाड्यासारखी खोली असता नये.** चांगल्या वृद्धाश्रमात ज्या सोयी सुविधा असाव्या असे आपल्याला वाटते त्या सर्व या सेंटर्समध्येही असायला हव्या. म्हणजे वृद्धांचा दिवस समवयस्कांबरोबर आनंदात जाईल व संध्याकाळी घरी आल्यावरही ते आनंदी राहू शकतील. दिवसभराच्या एकटेपणाने येणारा चिडचिडेपणा त्यांना येणार नाही. कौटुंबिक वातावरणाच्या दृष्टीने ही गोष्ट खूप पोषक ठरेल.

मुलांना पाळणाघरात ठेवणे जसे आता आपल्या अंगवळणी पडले आहे तसेच वृद्धांना डे केअर सेंटर्समध्ये ठेवणे सुद्धा सवयीचे होईल. **स्थानिक सामाजिक संस्था हा डे केअर सेंटर्सचा उपक्रम हाती घेऊ शकतील.**

# विवाह सहाय्य

*हितगजच्या वाचकांनी त्यांच्या कटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी. बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक*

**सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०), म. प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत आलेली स्थळे १/२००४ ते १९/२००४.**

**क्र. १/२००४ वधू** - विद्यागौरी दत्तात्रय कोट्टी, देशस्थ ऋग्वेद ब्राह्मण, गोत्र-अगस्ती, जन्म - ९.१२.१९७५, उंची - ५'-२'', शिक्षण एम्. कॉम. कॉम्प्युटर प्रोग्रॅमर, नोकरी NCC Office कोल्हापूर स्टेट, क्लार्क, मा. प्रा. रु. ४०००, चष्मा नाही, आई नोकरी करते, एक विवाहित भाऊ आहे, वडील नाहीत, चित्रकला, भरतकाम व वाचनाची आवड, अपंग पायात दोष, अंगावर पांढरे डाग, बांधा सुडौल. **अपेक्षा** - मुलगा ग्रॅज्युएट व सरकारी नोकरी किंवा स्वत:चा व्यवसाय, कोणत्याही ब्राह्मण पोटजातीतला चालेल. **संपर्क** - विजया दत्तात्रय कोट्टी, पिनॅक टेरेस, बाबुजी महालच्या शेजारी, फ्लॅट नं. १२, ए वॉर्ड, कोल्हापूर, फोन : २५४०२४०.

**क्र. २/२००४ वधू** - सोनाली नंदकुमार काये, जन्म - ३०.४.१९८१, उंची - ५'-४'', रंग गोरा, M.Com. I Appeared, Diploma Computer Application English, Marathi Typing. **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - श्री. नंदकुमार काये, जनक अपार्टमेंट, ए-९, सी, चेतना नगर (राणे नगर जवळ), नाशिक - ९. फोन : २३७०७८२.

**क्र. ३/२००४ वधू** - प्रिती परशुराम, गोखले, को.ब्रा., गोत्र-काश्यप, जन्म - ७.१२.१९७४, उंची - ५'-२'', M.Com., DCA, खाजगी शिकवण्या घेते, गव्हाळ रंग, मध्यम बांधा, O+ve, घरी आई वडील, एक धाकटी बहीण, व एक मोठी विवाहित बहीण आहे, वाचन व Computer Serfing चा छंद आहे. **अपेक्षा** - इंदोर भोपाळकडचा मुलगा चालेल पण पत्रिका पाहावयाची आहे, नोकरी किंवा स्वतंत्र व्यवसाय चालेल, शिक्षण पोस्ट ग्रॅज्युएट व पगार १०००० च्या पुढे, मुलगी नोकरी करेल पण अट नसावी. **संपर्क** - सौ. सविता परशुराम गोखले, जमुरखाना मामा का बाजार, लष्कर, ग्वाल्हेर, मध्यप्रदेश - ४७४००२. फोन : (०७५२) २४२५६४६.

**क्र. ४/२००४ वधू** - गायत्री अनिल जोशी, को.ब्रा., गोत्र - शांडिल्य, जन्म- १८.१२.१९७५, उंची - ५'-१'', BA सायकॉलॉजी व सतार शिक्षण, MA, नोकरी - संगीत शिक्षिका ज्ञान प्रबोधिनी व खाजगी क्लासेस, मा. प्रा. रु. ३०००, सावळा वर्ण, मध्यम बांधा, O+ve, घरी आई वडील व दोन बहिणी विवाहित. छंद चित्रकला, सतारवादन. **अपेक्षा** - उंची ५'-४'' ते ५'-६'', कोकणस्थ, वय ३०च्या पुढे चालेल, MBA, MCom, इंजिनियर व पगार १०००० च्या पुढे. **संपर्क** - अनिल दत्तात्रय जोशी, ४१९ अ, शनिवार पेठ, पुणे ३०, फोन : ४४३३४६८.

**क्र. ५/२००४ वधू** - रेवती सखाराम पटवर्धन, कोब्रा, गोत्र-कौडीण्य, जन्म - २३.१०.१९७४, उंची - ५'-३'', B+ve, मंगळ नाही, खाजगी नोकरी, मा. प्रा. रु. १५००, घरी आई वडील व एक भाऊ व बहीण विवाहित, संगीत व नाटक वगैरेची आवड. **अपेक्षा** - अनुरूप, पदवीधर व कोकणस्थ असावा. **संपर्क** - श्री. स. का. पटवर्धन, ११०२, हरभट रोड, पेठभाग, सांगली - ४१६४१६, फोन : (०२३३) २३३१४४८.

**क्र. ६/२००४ वधू** - ज्योत्स्ना वामन देवधर, कोब्रा, गोत्र-कौशिक, जन्म - १९.६.१९७३, उंची - ५'-२'', Computer Engineer, मुंबई विद्यापीठाचा डिप्लोमा, शास्त्रीय संगीताचा अभ्यास चालू, वाशी येथे नोकरी, मा. प्रा. रु. १५०००, वर्ण गोरा, मध्यम बांधा, ORh+ve, घरी आई वडील व एक लहान बहीण, कोथरूड येथे फ्लॅट, गाण्याचे आकाशवाणीवर व टिव्ही वर कार्यक्रम होतात, योग व Physical Fitness व Sports ची आवड, **अपेक्षा** - मुलगा उच्चशिक्षित, दिसायला चांगला व पुण्यात नोकरी असलेला व कोणत्याही ब्राह्मण शाखेचा चालेल, वयात २-३ वर्षांचे अंतर हवे. **संपर्क** - श्री. वामन रा. देवधर, गिरिजाशंकर सोसायटी, ब्लॉक नं. ११, राही हॉटेलजवळ, पनवेल - ४१०२०६, फोन : सौ. मंगला चितळे, (मावशी, पुणे) - ४३३८१३९, अशोक जोशी (मामा, पुणे) - ५६५५६८९.

**क्र. ७/२००४ वधू** - सुमेधा हणमंतराव कुळकर्णी, गोत्र-हरिनस देशस्थ ऋग्वेदी, जन्म - १८.११.१९७१, उंची - ५'-२'', B E Civil, मा. प्रा. रु. १५०००, वर्ण गोरा, मुलीला पुण्यात सरकारी नोकरी, कायम - बदली नाही, घरी आई-वडील, एक बहीण व भाऊ विवाहित, वाचन व सामाजिक कार्याची आवड. **अपेक्षा** - उच्चशिक्षित, इंजिनियर किंवा CA व पुण्यात कायम वास्तव्य. कोणत्याही ब्राह्मण शाखेचा चालेल. **संपर्क** - एच. आर. कुळकर्णी, ब्लॉक नं. ६०, लक्ष्मी विष्णु सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर - ३, फोन : (०२१७) २६०२४३०.

**क्र. ८/२००४ वधू** - वैशाली वामन मराठे,

कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - ८.४.१९७३, उंची - ५'', वर्ण निमगोरा, मध्यम बांधा, ORh+ve, चष्मा नाही, घरी आई-वडील, ३ बहिणी विवाहित व १ भाऊ विवाहित, गाण्याची आवड आहे. **अपेक्षा** - निर्व्यसनी, पदवीधर, नोकरी करणारा, पुण्याबाहेर जाण्याची तयारी हवी, कोणत्याही पोटशाखेचा चालेल. **संपर्क** - वामन नारायण मराठे, समर्थप्रासाद, १२२ सहकारनगर, दशभुजा गणपती रोड, पुणे-९. फोन : ४२३०५५१.

**क्र. ९/२००४ वधू** - मैत्रेयी कानडे, देशस्थ यजुर्वेदो, गोत्र-हरिनस, जन्म - १२.२.१९७८, उंची - ५'-३'', O+ve, गोरा वर्ण, मध्यम बांधा, मंगळ नाही, BSc (Micro) Biology, DHM, MPM, स्वत:चे क्लासेस, मा. प्रा. रु. ४-५ हजार, मुलीचा पूर्वी विवाह साधारण १।। वर्षापूर्वी झाला, सहाच महिन्यात पतीचे अपघाती निधन झाले. सध्या ती वडिलांकडे असते व घरी क्लासेस घेते, कुटुंब धार्मिक, आनंदी व समाधानी आहे, खेळीमेळीचे वातावरण आहे, गाण्याची, चित्रकलेची व नवीन पदार्थ करण्याची आवड आहे, तसेच स्वयंपाक उत्तम करते, सुगम संगीत व शास्त्रीय संगीत शिकते. **अपेक्षा** - ब्राह्मण शाखेतील, उच्चशिक्षित किंवा व्यवसायामध्ये स्थिर झालेला असावा, CA, BE किंवा कोणतीही Master Degree अपेक्षित. **संपर्क** - डॉ. मदन मोरेश्वर जोशी, १६६ कसबा पेठ, कसबा गणपतीजवळ, पुणे ४११०११.

**क्र. १०/२००४ वधू** - धरित्री मदन जोशी, देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण, गोत्र-काश्यप, जन्म - २५.४.१९८०, उंची - ५'-१'', निर्बळ मंगळ आहे, MSc डाएटेटिक्स, हॉस्पिटलमध्ये नोकरी, डाएटिशियन, पगार रु. ५०००, स्वत:चे कन्सल्टेशन, वर्ण गोरा, मध्यम बांधा, O+ve, घरी आई-वडील, दोन मोठ्या बहिणी आहेत, एकीचे लग्न झाले आहे, कसबा पेठेत वडिलांचा स्वत:चा दवाखाना व घर आहे. ड्रायव्हिंग, गाणे, वाचन तसेच कविता करण्याची आवड आहे, पाहुण्यांचे आगत स्वागत व स्वयंपाक चांगला येतो, नवीन पदार्थ करण्याची आवड. **अपेक्षा** - उच्चशिक्षित, अनुरूप, कोणत्याही ब्राह्मण शाखेतील, मनमिळाऊ, समजुतदार, दिलदार, मोठ्या माणसाचा आदर करणारा, व्यावसायिक पण चालेल, CA, BE Computer शिक्षित, डॉक्टर वगैरे. **संपर्क** - डॉ. मदन मोरेश्वर जोशी, १६६ कसबा पेठ, कसबा गणपतीजवळ, पुणे ४११०११.

**क्र. ११/२००४ वधू** - सविता दिगंबर जोशी, देशस्थ यजुर्वेदी, गोत्र-काश्यप, जन्म - १८.१०.१९७३, उंची - ५'-३'', B+ve, गहूवर्ण, चष्मा आहे, मंगळ सौम्य आहे, MSc (Statistics) DBM Veb Master Computer Course, खाजगी नोकरी (वास्तव्य पुणे) पगार रु. ४०००, आई-वडील, १ भाऊ अविवाहित, १ बहीण विवाहित, दुसरी शिकत आहे. **अपेक्षा** - देशस्थ यजुर्वेदी, ऋग्वेदी शाखा, १ ते ३ वर्षाचे अंतर, उच्चशिक्षित शांत, मनमिळाऊ, चांगल्या कंपनीत उच्च पदस्थ, व्यावसायिक, परदेशी जाण्याची तयारी, नोंदणी विवाहास प्राधान्य. **संपर्क** - दिगंबर नारायण जोशी, श्री स्वामी समर्थ एजन्सीज, ४८ मार्केट यार्ड, अहमदनगर, फोन : ३५६७२०/३५५९४५.

**क्र. १२/२००४ वधू** - तेजस्विनी प्रदीप पांळदे, कोब्रा, गोत्र-कौशिक, जन्म - १०.११.१९८१, उंची - ५'-३'', गौर वर्ण, सडपातळ बांधा, O+ve, BE Computer कंपनीत ट्रेनी म्हणून आहे, मा. प्रा. रु. १६००, घरी आई-वडील व एक भाऊ शिकत आहे. आप्त परिवार आहे, गाण्याची व भरतकामाची तसेच वाचनाची आवड आहे, स्वयंपाक करता येतो. **अपेक्षा** - उंची ५'-६'' च्या वर, इंजिनियरींग, वैद्यकीय पदवी, नोकरी किंवा व्यवसाय प्राप्ती २०००० पुढे. **संपर्क** - प्रदिप श्रीकृष्ण पांळदे, बी-५, सुंदर रेसीडेन्सी, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे - ५१, फोन : २४२७२०८०.

**क्र. १३/२००४ वधू** - स्नेहल सुहास मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - २०.८.१९८१, उंची - ५'-६'', वर्ण निमगोरा, सुदृढ, B+ve, BE (Electronics & Telecom), खाजगी नोकरी, मा. प्रा. रु. ८०००, घरी आई वडील व भाऊ विवाहित, आप्त नातेवाईक आहेत, गाण्याच्या तीन परीक्षा दिल्या आहेत, भरतकाम व विणकाम येते, वाचनाची आवड, स्वयंपाक व घरकामाची आवड आहे. **अपेक्षा** - उंची - ५'-१०'' च्या पुढे, इंजिनियरींग, वैद्यकीयमधील पदवी, नोकरी किंवा व्यवसाय, मा. प्रा. रु. २०००० च्या पुढे, शक्यते कोकणस्थ. **संपर्क** - सुहास श्री. मराठे, प्लॉट नं. १२, वर्धीनी, महाबळी हौ. सो., सहवास सोसा. समोर, कर्वे नगर, पुणे ५२, फोन : २५४६८९३२.

**क्र. १४/२००४ वर** - अंबरीश उल्हास मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - ५.१२.१९७२, BSc Diploma in Seals Marketing Management, इफ्को टोकियो जनरल इन्शुअरन्स कंपनी मध्ये नोकरी, पगार १००००, वर्ण गोरा, घरी आई वडील आहेत, एकुलता एक मुलगा. **अपेक्षा** - पदवीधर, कोकणस्थ व मुंबईची राहणारी पत्रिका पाहायची आहे. **संपर्क** - उल्हास बाळकृष्ण मराठे, अविनाश सोसायटी, डी/१२, हरणी रोड, वडोदरा ३९०००६.

**क्र. १५/२००४ वर** - मंदार श्रीकांत विद्वांस, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - ३०.९.१९७२, उंची - ६'-२'', सौम्य मंगळ, वर्ण गोरा, सुदृढ, O+ve, चष्मा नाही, शिक्षण बारावीपर्यंत, M/Dev Str. Construction Pvt. Ltd. Shivajinagar मध्ये नोकरी, मा. प्रा. रु. ५५००, घरी आई वडील व स्वत:चा फ्लॅट आहे. **अपेक्षा** - उंची - ५'-४'' च्या पुढे व नोकरी असावी अथवा करण्याची इच्छा असावी, ब्राह्मण शाखेची चालेल. **संपर्क** - श्रीकांत यशवंत विद्वांस, ४ मधूदीपा सोसायटी, भेलकेनगर, शिवाजी पुतळ्याजवळ, कोथरुड, पुणे ४११०३८, फोन : २५३९९७८९.

**क्र. १६/२००४ वर** - सुनील जनार्दन मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म -

३०.६.१९७०, उंची - ५'-७'', मंगळ नाही, गोरा, सडपातळ, O+ve, शिक्षण B.Com & Computer Course, खाजगी नोकरी, मा. प्रा. रु. ६५००, घरी आई वडील व मोठा भाऊ व बहीण दोघेही विवाहित, क्रिकेट, सिनेमा, गाणी तसेच फिरण्याची आवड. **अपेक्षा** - उंची ५' फूट किंवा जास्त, नोकरी करणारी व ब्राह्मण शाखेची असावी. **संपर्क** - जनार्दन केशव मराठे, बी-१८, नव रामेश्वर दर्शन, पंचायत विहिरीजवळ, नवरे पुराणिक रोड, पेंडसेनगर रोड नं. १, डोंबिवली (पूर्व), ४२१२०१, फोन : ९५२५१-२४५७४२१.

**क्र. १७/२००४ वर** - विक्रम विश्वास मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - २१.११.१९७४, उंची - ५'-९'', सौम्य मंगळ, वर्ण गोरा, सुदृढ, O+ve, शिक्षण M.Com, DCA, MBA, Reliance Industries Ltd. (Marine Drive Mumbai) मध्ये Export Manager, मा. प्रा. रु. १८०००, घरी आई वडील व एक मोठी बहीण विवाहित, पेंटिंग, स्केचिंग, कविता करण्याचा छंद व निर्व्यसनी आहे. **अपेक्षा** - उंची - ५'-३'' ते ५'-४'', पोस्ट ग्रॅज्युएट, उत्पन्न १००००, नोकरी हवी व मुंबईत राहण्याची तयारी, ब्राह्मण पोटशाखेची, घरात सहकार्य करणारी. **संपर्क** - विश्वास श्रीपाद मराठे, १७५६ सदाशिव पेठ, भिकारदास मारुती पोलीस चौकीसमोर, मराठे वाडा, पुणे ३०, फोन : २४४७५६०८.

**क्र. १८/२००४ वर** - अमित अरविंद खरे, को.ब्रा., गोत्र-कौशिक, जन्म - १९७७, उंची - ५'-८'', मंगळ नाही, गहूवर्ण मध्यम, O+ve, चष्मा आहे, शिक्षण BE (Electronic & Telecommunication), नोकरी अमेरिका, मा. प्रा. रु. ५००० US $ (USA), घरी आई वडील व एक भाऊ, बहीण विवाहित, ट्रेकिंग व सर्व Out & Indoor खेळ खेळतो, मे, जून २००४ मध्ये पुण्यात येणार आहे, पोहणे व गाण्याची आवड. **अपेक्षा** - उंची - ५'-३'' ते ५'-६'', गोरी, स्मार्ट, सॉफ्टवेअर, आर्किटेक्ट, फिजियो थेअरपीस्ट, फॉरेनला रहायची तयारी असावी, मंगळ नको, कुठल्याही शाखेची चालेल. **संपर्क** - अरविंद विनायक खरे, २०२ शनिवार पेठ, पोलीस चौकीजवळ, अक्षय नर्सिंग होमच्या वर, पुणे ३०, फोन : २४४५३७९०, २४४५८४९२.

**क्र. १९/२००४ वर** - उदय गणेश मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - ३१.७.१९७१, उंची - ५'-११'', वर्ण गोरा, मध्यम बांधा, A+ve, शिक्षण B.Com, Om Kotak Mahindra Insurance Co. Ltd. मध्ये Sales Associate, पगार रु. १००००, मुलाला आई वडील नाहीत, एक बहीण विवाहित, नाशिकला असते, धाकटा भाऊ खाजगी कंपनीत नोकरी करतो. **अपेक्षा** - कोणत्याही ब्राह्मण शाखेची पदवीधर व नोकरी करणारी. **संपर्क** - उदय गणेश मराठे, २०१ शनिवार पेठ, गोखले वाडा, अक्षय नर्सिंग होम शेजारी, पुणे ३०, फोन : २४४७७३७९, मोबाईल ९८९००२५४९०.

***

## श्रावण

श्रावणाच्या नभानेच
मोहरून जावून
थेंबांचे मोती शिंपडले
अक्षदा म्हणून

रेशमी धारांनी
हे तन भिजवून
तुझे नि माझे मन
टाकले गुंफून

मिळाल्या चालना
दोघांच्या पाऊलांना
कौशल्याने सांभाळल्या
एकमेकांच्या भावना

दोघांचं विश्व
बुद्धिरूपाने आखलं.
चतुराईच्या धाग्याने
दोन्ही आत्म्यांना शिवलं

तळपणाऱ्या विजेने
होकार दिला प्रेमाने
आपल्या नात्याला
बांधले इंद्रधनूने

जपणार ही मंगलता
दैवाच्या साथीने
झाली एकरूपता
श्रावणाच्या साक्षीने

- **डॉ. सौ. सीमा श्याम** (पृ.४११), पुणे

हसरे हितगुज

## प्रेमपत्रासाठी क्रिकेट भाषा

माझ्या अमेरिकेत असलेल्या मित्राचा २१ वर्षाचा नातू मुंबईला अमेरिकन कंपनीतर्फे नोकरीस आला होता. अमेरिकेत क्रिकेट खेळला जात नाही. त्यामुळे त्याला क्रिकेटची फार माहिती नव्हती. तो येथील एका क्रिकेटवेडया मुलीच्या प्रेमांत पडला. ''व्हेलेनटीन डे'' च्या दिवशी त्याला तिला पत्र पाठवायचे होते. त्याने माझा सल्ला विचारला. मी त्याला "क्रिकेटच्या भाषेत" प्रेमपत्र लिहून दिले -

Lovely Maiden

For last one year, I am indulging in Googly gestures giving Bumper presents and gifts of designer Body-line clothes with Slips. I Follow on you during your Run to office from bus stop and back. Many times I corner you in Gully opp. your residential complex. But you are Defending your stout heart, like Sachin and not Getting Out.

On this, 'Valentine Day' cross the Crease and Throw Your Wicket and convert our One Day sweet meetings into life long association.

Yours and yours only,

ते पत्र मिळताच त्याची प्रेयसी खूष झाली. दोघेही विवाहबध्द झाले. पुढच्या व्हेलेनटीन डे च्या आधी त्यांच्या छोटया ''सचिनला'' घेऊन माझा आशीर्वाद स्वीकारून अमेरिकेस रवाना झाले.

- **गजानन भास्कर** (पृ.४२७) घाटकोपर, मुंबई.

एकमेकां साह्य करू

## बंगला विकणे आहे

१ हजार चौ. फू. बांधकाम, (१२ x १० च्या दोन बेडरुम, किचन आणि १८ x १५ चा हॉल) ७/१२ स्वत:चा स्वतंत्र आहे. पूर्वेला आणि उत्तरेला १२/१२ फूट जागा मोकळी आहे. चारही बाजूंनी फरशी आहे. थोडी बाग आहे. स्वत:चे बोअरिंग गेली ८ वर्षे चालू स्थितीत आहे. दहा लाख रु. अपेक्षित आहे. परंतु योग्य व्यक्तिला पसंत पडल्यास व्यवहाराला फारशी अडचण येणार नाही. पत्ता : श्री. दिवाकर जगन्नाथ विद्वांस, संत गजानन महाराज नगर, सर्व्हे नं. ५९, प्लॉट नं. १०२, कोंढवा (बु.), पुणे ४. (सध्या सदाशिव पेठेत राहाण्यास आलो आहे. प्रथम फोनवर संपर्क साधावा. फोन : २४४६३९१६.)

## या अंकात

१. **हसणं एक शोभादर्शक (कॅलिडोस्कोप)**......... पृ.१
नितीन शंकर मराठे, नाशिक

२. **सुट्टीचा सदुपयोग करण्याची संधी**............... पृ.१
प्रमोदन मराठे, पुणे

३. **करोडपती पासबुक - आरोग्याची दारिद्र्यरेषा**... पृ.२
यशवंत लक्ष्मण मराठे, विंग कमांडर, निवृत्त, पुणे

४. **मुंबई-पुण्याची मोट बांधणाऱ्या मीनाताई**......... पृ.४
सौ. नीलांबरी रमेश, पुणे

५. **पुणे संमेलनाबाबत कुलबांधवांच्या प्रतिक्रिया**.. पृ.४,५
सौ. माधवी श्रीकृष्ण मराठे, गोरेगांव, भास्कर नरहरी मराठे, रत्नागिरी, अनिलकुमार दत्तात्रेय जाईल, घाटकोपर, विठ्ठल महादेव मराठे, सांगली, माधुरी मधुसूदन खांबेटे, पुणे, श्रीमती सुशीला दत्तात्रय मराठे, पुणे

६. **श्री व्याडेश्वर**................................ पृ.५,६
माधव मराठे, पुणे

७. **श्रीमानव सेवा संघ, मुंबई**.................... पृ.६,७
अनंत धोंडो खांबेटे, शीव, मुंबई

८. **ज्येष्ठ नागरिक निवास - आजची गरज?**...... पृ.७
मीनानाथ लक्ष्मण मराठे, पुणे

९. **पुणे संमेलन - एक चिंतन**..................... पृ.७
चिंतामण त्र्यंबक, कळवा, प्रभाकर जगन्नाथ विद्वांस, माटुंगा

१०. **महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व**............. पृ.८
सौ. सरोजिनी अनुरूप मराठे, पुणे

११. **वृद्धांसाठी डे केअर सेंटर्स**...................... पृ.८
सौ. मंगला प्रवीण मराठे, गोरेगांव, मुंबई

१२. **श्रावण (कविता)**.............................पृ.११
डॉ. सौ. सीमा श्याम मराठे, पुणे

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३), **विवाह सहाय्य** (पृ.९ ते ११) आणि **हसरे हितगुज** (पृ.११) ही नेहमीची सदरे.

बुक पोस्ट

प्रति

**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)